दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले ● अंक २८७ वा ● शुक्रवार ०८ मार्च २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 287 | Date : 08/03/2024 blow Friday Page 4 Price 4




## महिला दिनानिमित्त पंतप्रधान मोदींची भेट;

# घरगुती एलपीजी सिलिंडरच्या दरात मोठी कपात



नवी दिल्ली : जागतिक महिला दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशभरातील महिलांसाठी एक दिलासादायक निर्णय घेतला आहे. घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या दरात १०० रुपयांची कपात करण्याची घोषणा पंतप्रधान मोदी यांनी एक्सवरून केली. पंतप्रधान मोदी यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, आज महिला दिन आहे. त्यामुळे आमच्या सरकारने एलपीजी सिलिंडरच्या दरात १०० रुपयांची कपात । पान २ वर

### सिलिंडरचे दर अर्ध्यावर आणावेत : सुप्रिया सुळे

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निर्णयानंतर सुप्रिया सुळे यांनी मात्र टीका केली आहे. मोदी सरकार मागच्या पाच वर्षांपासून सत्तेत आहे. मग सिलिंडरच्या दरात कपात करण्यासाठी आजचाच मुहूर्त का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. अवघ्या काही दिवसांवर आता लोकसभा निवडणुका आल्या आहेत. त्यामुळे निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर हा एक जुमला आहे. हा एक राजकीय निर्णय असून त्यात महिलांना दिलासा देण्याचा कोणताही उद्देश दिसत नाही. आमच्या काळात गॅस सिलिंडर ४३० रुपयांना मिळत होता. महिलांवरील आर्थिक भार कमी करायचा असेल तर सिलिंडरचे अर्ध्यावर आणायला हवेत.

## महाराष्ट्र जल संपत्ती नियमन प्राधिकरणाच्या सदस्यपदी राजेंद्र मोहिते



मुंबई : महाराष्ट्र जल संपत्ती नियमन प्राधिकरणाच्या सदस्यपदी नेमणूक झाल्याने राजेंद्र मोहिते यांना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पद व गोपनीयतेची शपथ दिली. सह्याद्री अतिथी गृह येथे झालेल्या पदग्रहण कार्यक्रम प्रसंगी त्यांना सदस्यत्वाची शपथ देण्यात आली. यावेळी जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव दीपक कपूर आणि उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी उपस्थित होते.

## तीन राज्य माहिती आयुक्तांचा शपथविधी

### मकरंद रानडे, शेखर चन्ने, डॉ. प्रदीप कुमार व्यास राज्य माहिती आयुक्त

मुंबई : महाराष्ट्र राज्याचे लोकायुक्त न्यायमूर्ती व्ही. एम. कानडे यांनी मकरंद मधुसूदन रानडे, शेखर मनोहर चन्ने, डॉ. प्रदीप कुमार व्यास यांना राज्य माहिती आयुक्तपदाची शपथ दिली. आज मंत्रालयात राज्य माहिती आयुक्तपदांच्या शपथविधी सोहळा पार पडला. यावेळी राज्याचे मुख्य माहिती आयुक्त समीर सहाय, सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव सुजाता सौनिक, राजगोपाल देवरा, नितीन गद्रे, माजी मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांच्यासह नागपूर खंडपीठाचे राज्य माहिती आयुक्त राहूल पांडे, नाशिक खंडपीठाचे राज्य माहिती आयुक्त भुपेंद्र गुरव यांची उपस्थिती होती.

## सर्वोच्च न्यायालयाची नार्वेकरांना नोटीस, ८ एप्रिलला सुनावणी

नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयाने आज विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना नोटीस बजावून शिवसेनेबाबत घेतलेल्या सुनावणीचे सर्व दस्तऐवज जमा करण्यास सांगितले आहे. नार्वेकर यांनी हे दस्तऐवज १ एप्रिलपर्यंत सादर करायचे आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी ८ एप्रिलला होणार आहे. नार्वेकर यांनी दिलेल्या शिवसेना आमदार अपात्रतेच्या निकालाविरोधात ठाकरे गट सुप्रीम कोर्टात गेला होता. आज ठाकरे गटाच्या याचिकेवर सुप्रीम कोर्टात सुनावणी झाली. या सुनावणीत कोर्टाने खरी शिवसेना कोणती हे ठरवण्यासाठी विधानसभेच्या बहुमताच्या चाचणीवर अवलंबून राहणे हे सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या विरोधात नाही का असा थेट सवाल करत नार्वेकरांच्या निकालावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

आजच्या सुनावणीत काय घडले?

आजच्या सुनावणीत कपिल सिब्बल यांनी ठाकरे गटाची बाजू मांडली. यावेळी बोलताना त्यांनी नोव्हेंबरमध्ये कार्यकाळ संपणार आहे. त्यामुळे यावर लवकर सुनावणी झाली पाहिजे, नाही तर प्रकरण निरस्त ठरेल, अशी विनंती कोर्टाला केली. तसेच अध्यक्षांनी तुमच्या निर्णयाचा चुकीचा अर्थ लावला आहे, असेही कोर्टाच्या निदर्शनास आणून दिले.

शिंदे गटाकडून हरीश साळवे यांनी बाजू मांडली. यावेळी त्यांनी ठाकरे गटाने विधानसभा अध्यक्ष यांच्याकडे दाखल केलेली कागदपत्रे आणि कोर्टात दाखल केलेली कागदपत्रे यात तफावत आहे. हा फक्त एक मुद्दा आहे. असे अनेक मुद्दे आहेत, असा दावा केला. यावर सरन्यायाधीशांनी आमच्या निकालपत्रात जे लिहिलेले आहे त्याविरोधात निर्णय नाही झालाय का असा थेट सवाल साळवेंना विचारला. ८ एप्रिलला याप्रकरणी पुढील सुनावणी होणार आहे. दरम्यान, या प्रकरणाची सुनावणी उच्च न्यायालयात व्हावी, अशी शिंदे गटाची महत्त्वाची मागणी सुप्रीम कोर्टाने फेटाळली आहे. त्यामुळे शिवसेना शिंदे गट आणि राहुल नार्वेकरांसाठी हा सर्वात मोठा धक्का मानला जात आहे.

## ४० टक्के कृषी फीडर सौरऊर्जेवर येऊन शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळेल : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस





मुंबई : राज्यातील कृषी क्षेत्रासाठी आजचा दिवस ऐतिहासिक ठरला आहे. सुमारे ९ हजार मे. वॉट सौरऊर्जेसाठी विकासकांना देकारपत्र (लेटर ऑफ अवॉर्ड) आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. यातून ४० हजार कोटी रुपये गुंतवणूक होणार असून, २५ हजार रोजगार निर्माण होणार आहेत. पुढच्या वर्षी ४० टक्के कृषी फीडर सौरऊर्जेवर येणार असून, शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळणे शक्य होणार आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया राबवून हे देकारपत्र आज सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या एका कार्यक्रमात प्रदान करण्यात आले. शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळावी, यासाठी २०१६ मध्ये देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजना प्रारंभ केली होती. त्यानंतरच्या काळात २ हजार मे.वॉट पर्यंत निर्मिती करण्यात आली. आता ९ हजार मे.वॉट सौरऊर्जा तयार करण्यात येणार आहे, त्यामुळे ४० टक्के कृषी फीडर हे सौरऊर्जेवर येतील.

यावेळी उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी आजचा दिवस ऐतिहासिक आहे. राज्यातील असंख्य शेतकऱ्यांची दिवसा वीजेची सातत्याने मागणी होती. ही मागणी आता पूर्ण करणे शक्य होणार आहे. त्यामुळे हा दिवस महाराष्ट्राच्या कृषी जगतात सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल. अतिशय कमी कालावधीत प्रकल्पासाठी जागा मिळाल्या आहेत. त्यामुळे प्रकल्पाचे कार्यान्वयन शक्य होणार आहे. सर्वांत आधी सौर ऊर्जेवरील । पान २ वर

## केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात ४ टक्के वाढ

नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीपूर्वी आणि होळी सणाच्या तोंडावर केंद्रातील मोदी सरकारने गुरुवारी केंद्रीय कर्मचाऱ्यांना मोठे गिफ्ट दिले. केंद्रीय मंत्रिमंडळाने कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात (डीए) ४ टक्के वाढ करण्यास मंजुरी दिली आहे. याचा लाभ ४८.६७ लाख केंद्रीय सरकारी कर्मचारी आणि ६७.९५ लाख पेन्शनधारकांना होणार आहे. आजच्या ४ टक्क्यांच्या वाढीसह महागाई भत्ता ५० टक्क्यांवर पोहोचला आहे. १ जानेवारी २०२४ पासून वाढीव डीए लागू होईल. ही वाढ सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशींच्या आधारे करण्यात आली आहे. सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार, डीए ५० टक्क्यांपर्यंत पोहोचल्यास घरभाडे भत्ता, मुलांचा शिक्षण भत्ता, वाहतूक भत्ता आदींमध्येही वाढ होणार आहे.

## प्रकाश आंबेडकरांच्या नव्या मागणीमुळे ठाकरे गटासमोर पेचप्रसंग



मुंबई : प्रकाश आंबेडकर यांनी केलेल्या नव्या मागणीमुळे शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस समोर पेचप्रसंग उभा राहिला आहे. आगामी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने महाविकास आघाडी आणि महायुतीचे घोडे जागावाटपावर अडले आहे. महायुतीत भाजपाला शिंदे गट आणि अजित पवार गटाला जागा सोडण्याची कसरत करावी लागत आहे. तर महाविकास आघाडीत शिवसेना, काँग्रेस आणि शरद पवार गटाला वंचितसाठी जागा सोडाव्या लागणार आहेत. जागावाटपाचे त्रांगडे दिवसेंदिवस गुंतागुतींचे होत असल्याचे दिसत आहे. त्यातच आता प्रकाश आंबेडकर यांच्या नव्या भूमिकेमुळे मविआसमोरच्या अडचणी वाढताना दिसत आहेत.

टिव्ही ९ वृत्तवाहिनीशी संवाद साधताना प्रकाश आंबेडकर म्हणाले, शिवसेना आणि काँग्रेस यांच्यात दहा जागांवरून एकमत झालेले नाही. तसेच शिवसेना आणि राष्ट्रवादी यांच्यात पाच जागांवरून एकमत झालेले नाही. त्यांच्यात एकमत झाल्यानंतर आम्ही चर्चेत सहभाग घेऊ शकतो. त्यांचे एकमत होत नाही, तोपर्यंत आम्ही बघ्याच्या । पान २ वर

## नागपुरात हजारो कोंबड्यांना 'बर्ड फ्लू'! साडेआठ हजार कोंबड्या मारण्याचे आदेश

नागपूर : उपराजधानीतील राज्य शासनाच्या प्रादेशिक अंडी उबवणी केंद्रात हजारो कोंबड्यांना बर्ड फ्लूचे संक्रमण झाल्याची धक्कादायक माहिती पुढे आली आहे. येथील व जवळपासच्या सुमारे साडेआठ हजार कोंबड्यांना मारण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहेत.

या केंद्रातील 'कुक्कुट पालन केंद्रात' बर्ड फ्लूचा उद्रेक झाला. गेल्या काही दिवसांत रोज शेकडो कोंबड्यांचा मृत्यू होत होता. पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांनी मृत्यूचे कारण तपासण्यासाठी आजारी कोंबड्यांचे नमुने पुणे आणि नंतर भोपाळमधील उच्च सुरक्षा प्रयोगशाळेत पाठवले. चार मार्चला आलेल्या अहवालात या कोंबड्यांना 'बर्ड फ्लू' म्हणजे एवियन इन्फ्लुएंजाची लागण झाल्याचे स्पष्ट झाले.प्रशासनाने नियमानुसार संबंधित कुक्कुटपालन केंद्राचा एक किलोमीटरचा परिसर बाधित क्षेत्र तर दहा किलोमीटरपर्यंतचा परिसर निगराणी क्षेत्र म्हणून जाहीर केला आहे. त्यानंतर पाच मार्चच्या रात्री संबंधित कुक्कुटपालन केंद्रातील ८ हजार ५०१



कोंबड्यांना मारण्याची प्रक्रिया केली गेली. सोबतच केंद्रातील १६ हजारांहून जास्त अंडीही नष्ट केली गेली. नागपूरच्या जिल्हा परिषद संवर्धन उपायुक्त मंजूषा पुंडलिक यांनी बर्ड फ्लूचा उद्रेक झाल्याचे मान्य केले. प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना पुंडलिक म्हणाल्या, नागरिकांनी घाबरून जाण्याचे कारण नाही. शासनाने संबंधित पोल्ट्री फार्ममध्ये संक्रमण आढळल्यावर नियमानुसार कोंबड्या आणि अंडी नष्ट केली. प्रादेशिक अंडी उबवणी केंद्राव्यतिरिक्त नागपूर जिल्ह्यातील इतर कुठल्याही कुक्कुटपालन केंद्रावर सध्या संक्रमण झाल्याची माहिती समोर आलेली नाही.

पशुवैद्यकीय विद्यापीठातील केंद्रातही संक्रमण । पान २ वर

## संभाव्य पाणी टंचाईवर मात करण्यासाठी सुक्ष्म नियोजन करावे : महसूल उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर

पंढरपूर/प्रतिनिधीः जिल्ह्यात पाऊस कमी प्रमाणात झाल्याने धरणात पाणीसाठा कमी आहे. आज धरणातील पाणीसाठा लक्षात घेता पिण्याचे पाणी, जनावरांसाठी लागणारे पाणी व चारा या बाबींना प्राधान्य देवून ग्रामीण भागात कोणत्याही गावात पाण्याची टंचाई भासू नये यासाठी संबधित विभागाने सूक्ष्म नियोजन करावे, अशा सूचना महसूल उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांनी दिल्या.

संभाव्य पाणी व चारा टंचाई सदृश्य परिस्थिती निवारणार्थ उपाययोजना करण्यासाठी पंढरपूर व मोहोळ तालुक्याची आढावा बैठक शेतकी भवन, पंचायत समिती पंढरपूर येथे घेण्यात आली. यावेळी बैठकीस प्रांताधिकारी सचिन इथापे, अजिंक्य घोडगे, तहसीलदार सचिन लंगोटे, सचिन मुळीक, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. नवनाथ नरळे,, गटविकास अधिकारी आनंद मिरगणे, नायब तहसीलदार मनोज श्रोत्री तसेच संबंधित विभागाचे विभाग प्रमुख तसेच मंडल अधिकारी उपस्थित होते.

यावेळी महसूल उपजिल्हाधिकारी श्री. नाटेकर म्हणाले, तालुक्यात निर्माण होणारी संभाव्य पाणी व चारा टंचाई लक्षात घेऊन त्या संदर्भात तात्काळ उपाययोजना संबंधित यंत्रणेने कराव्यात. जून अखेर पिण्याचे पाणी पुरेल, जनावरांना चारा उपलब्धता या दृष्टीने नियोजन करावे.

टंचाई कालावधीत ज्या उद्धभवावरून (पाणी घेण्याचे ठिकाण) पाण्याची उपलब्धता होणार आहे त्याची निश्र्चिती करून सोर्स मॅपिंग करावे, प्रगतीपथावर असलेल्या पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्याकडे लक्ष द्यावे, विंधन विहीर खोलीकरण करावे ज्या भागात सार्वजनिक विहिरी या आटल्या असतील अशा ठिकाणी खाजगी विहिरी अधिग्रहित कराव्यात. दि.०८ मार्च रोजी उजनी धरणातून भीमा नदी पात्रात पाणी सोडण्यात येणार असून हे पाणी शेवटपर्यंत पोहोचण्यासाठी भीमा नदीकाठचा वीजपुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे. बेकायदा पाणी उपसा करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करून संबंधित साहित्य जप्त करण्यात येणार आहे. त्याच बरोबर आरक्षित पाणी साठ्याचा अवैध उपसा होवू नये, यासाठी आवश्यकती कार्यवाही करावी अशा सूचना महसूल उपजिल्हाधिकारी श्री. नाटेकर यांनी यावेळी दिल्या.

पंढरपूर तालुक्यात दुष्काळ सदृश्य परस्थिती घोषित करण्यात आली असून, दुष्काळ परिस्थितीत देण्यात येणाऱ्या सर्व सवलती लागू करण्यात असून, तालुक्यात सद्यस्थितीत एकही पाणी पुरवठ्याचा टँकर सुरु नसल्याचे तहसिलदार सचिन लंगुटे यांनी सांगितले.

तालुक्यात एक लाख २२ हजार ७२४ मोठी जनावरे तर ५१ हजार ७०५ लहान जनावरे असे एकूण एक लाख ७४ हजार ४२९ जनावरे असून तालुक्यात एकूण पेरणी केलेल्या क्षेत्रामधून ५ लाख ४ ७ हजार ५९५ मॅट्रिक टन ओला चारा उपलब्ध होणार असून , सरासरी १६० दिवस पुरेल एवढा चार उपलब्ध होईल असे पशुधन विकास अधिकारी डॉ. पी एम जाधव यांनी यावेळी सांगितले. ग्रामीण पाणी पुरवठ्याचे उप अभियंता श्री.पांडव



यांनी कासेगांव प्रादेशिक पाणी पुरवठा योजना तांत्रिक कारणांमुळे सद्यस्थितीत बंद असून, ती तात्काळ सुरु करण्यात येणार असल्याचे सांगितले. यावेळी पंढरपूर व मोहोळ तालुक्यातील ग्रामीण पाणीपुरवठा योजना, टँकरची मागणी होणारी गावे, जल जीवन मिशन मधून करण्यात आलेल्या उपाययोजना, महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सुरू असलेली कामे, जनावरांच्या तुलनेत चाऱ्याची स्थिती याबाबत बैठकीत आढावा घेण्यात आला

दैनिक
यश सिद्धि न्यूज



# संपादकीय

## त्यांची राजकीय क्लृप्ती ..

समन्स पाठवले असतील तर त्याचा आदर करावा. चौकशीला हजर राहून आपली बाजू मांडावी असे सर्वोच्च न्यायालयानेच स्पष्ट केले आहे. ईडीने मद्रास उच्च न्यायालयाच्या आदेशाविरोधात याचिका दाखल केली होती. तमिळनाडूतील कथित वाळू खाण घोटाळ्याशी संबंधित हे प्रकरण आहे. ईडीने जिल्हाधिकाऱ्यांना बजावलेल्या समन्सला उच्च न्यायालयाने स्थगिती दिली होती. त्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. त्यावर न्यायालयाने वरील भाष्य केले आहे. हे एक प्रकरण झाले. दिल्लीतील मद्य धोरणाशी संबंधित प्रकरणही काहीसे त्याच वाटेने जाणारे किंवा पुढे गेलेले आहे. किंबहुना तमिळनाडूतील प्रकरणापेक्षा दिल्लीच्या प्रकरणात नेमके काय होते याची सगळ्यांना उत्सुकता आहे. त्याचे एक कारण म्हणजे आतापर्यंत ज्या ज्या राजकीय नेत्यांना ईडीने समन्स बजावले आहेत त्यांनी त्याचा आदर करत चौकशीला सामोरे गेले आहेत. त्यांच्या पक्षाकडून ईडीवर राजकीय अथवा तत्सम आरोप झाले तरी त्यांनी चौकशीचा फेरा टळला नाही. दिल्लीचे प्रकरण अभूतपूर्व असे ताणले गेले आहे. त्या राज्याचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी विविध कारणे उपस्थित करत चौकशी टाळली आहे. राजकारणात आरोप-प्रत्यारोप होत असतात. सत्ताधारी विरोधकांच्या निशाण्यावर असतात किंवा सत्तांतर झाल्यावर विरोधक सत्ताधाऱ्यांच्या निशाण्यावर येतात. त्यातून तपास संस्थांच्या चौकशांना राजकीय सूडाचा रंग दिला जातो. तथापि, एखाद्या प्रकरणात समन्सकडे दुर्लक्षच करायचे हे कशाचे लक्षण आहे? आपण निर्दोष आहोत याची ही ठाम खात्री आहे की हा एकप्रकारचा लपंडाव सुरू आहे. हे सगळे होताना एक गोष्ट त्यातून दुर्लक्षित होत आहे व ती म्हणजे आज ना उद्या चौकशीला सामोरे जावेच लागणार आहे. केजरीवाल यांना आठ वेळा समन्स पाठवले आहेत. त्यांच्यापूर्वी झारखंडचे तत्कालीन मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनीही टाळाटाळ केली होती. त्यांना सोईस्कर वेळ आणि ठिकाण सांगत त्यांनी चौकशीला सामोरे जाण्याची सशर्त तयारी दर्शवली आणि अखेर त्यांना ईडीचा सामना करावा लागला व त्यांना अटकही झाली. काँग्रेसच्या सर्वोच्च नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी आणि शरद पवार अशा मोठ्या नेत्यांनीही विविध प्रकरणात त्यांना आलेल्या समन्सचा आदर राखला व चौकशीला सामोरे गेले. केजरीवाल मात्र त्याला वेगळेच वळण देऊ पाहात आहेत. कदाचित आपण राजकीय बळी ठरतो आहे असे भासवून सहानुभूती मिळवण्याची त्यांची राजकीय क्लृप्ती असू शकते.

पान १ वरुन

## घरगुती एलपीजी सिलिंडरच्या ..

करण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे देशातील लाखो कुटुंबांवरील आर्थिक भार काही प्रमाणात हलका होणार आहे. तसेच या निर्णयाचा फायदा नारी शक्तीला होणार आहे.

पंतप्रधान मोदी यांनी आणखी एक ट्विट करत म्हटले की, आम्ही आमच्या नारी शक्तीच्या सामर्थ्याला, धैर्याला सलाम करतो. तसेच महिलांनी विविध क्षेत्रात केलेल्या कामगिरीचे कौतुक करतो. आमचे सरकार शिक्षण, उद्योग, कृषी, तंत्रज्ञान आणि इतर क्षेत्रात महिलांना पुढे घेऊन जाण्यासाठी त्यांचे सक्षमीकरण्यासाठी कटिबद्ध आहोत. एक मार्चपासून व्यावसायिक वापराच्या १९ किलो वजनाच्या एलपीजी सिलेंडर्सच्या किमतींमध्ये तब्बल २५ रुपये वाढ करण्यात आली. त्यामुळे व्यावसायिक सिलिंडरचे दिल्लीमधील दर १७९५ रुपये तर मुंबईत १७४९ रुपयांना व्यावसायिक सिलिंडर मिळत आहे. चेन्नई व कोलकात्यामध्ये हेच दर अनुक्रमे १९६० आणि १९११ रुपये इतके आहेत.

## ४० टक्के कृषी फीडर सौरऊर्जेवर ..

ही संकल्पना प्रायोगिक तत्वावर राळेगणसिद्धी जि. अहमदनगर येथे साकारण्यात आली. ती कमालीची यशस्वी झाली. आता जागा उपलब्धतेसाठी महसूल यंत्रणेने केलेल्या भरीव कार्यामुळे हे शक्य झाले. विकासकांना यापुढेही सर्व शासकीय यंत्रणा मदत करतील. कुठेही अडचण आल्यास त्या सोडविण्यासाठी शासन कायम पाठीशी असेल.राज्यात ३६०० मेगॅवॉट सौर ऊर्जा क्षमता आतापर्यंत स्थापित आहे. पण, आता अवघ्या ११ महिन्यात ९००० मेगॅवॉटची प्रक्रिया राबवून सरकारने एक नवा विक्रम घडविला आहे. सरकारने कमीत कमी कालावधीत जागा उपलब्ध केल्याने हा प्रकल्प कार्यान्वित करणे शक्य झाले आहे. या प्रकल्पामुळे शासनावरील विविध वीज सवलतींमुळे पडणारा आर्थिक भारही कमी होणार आहे, असेही उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले. हा प्रकल्प १८ महिन्यात पूर्ण करायचा असला तरी सोबत काम केले तर १५ महिन्यातच तो पूर्ण होऊ शकतो. आता हा प्रकल्प सुरू होणार म्हणून अधिकाऱ्यांनी थांबू नये. उर्वरित ५० टक्के कृषी फीडर सौरऊर्जेवर आणण्यासाठी नियोजनाच्या तयारीला तत्काळ लागावे. पुढील दोन ते तीन वर्षात ८ लाख सौर ऊर्जा पंपसुद्धा शासनाला द्यावयाचे आहेत, त्याची कार्यवाही सुरू करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत शेतकऱ्यांना १.२५ लाख रुपये प्रतिहेक्टर वार्षिक भाडे दिले जाते. यावेळी हुडकोसोबत एक सामजंस्य करार सुद्धा करण्यात आला. यामधून ५ हजार कोटी रूपये प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी मिळणार आहेत.

रिलायन्ससोबत ग्रीन हायड्रोजन ऊर्जा निर्मितीसाठी सामजंस्य करारसुद्धा करण्यात आला. या करारामुळे राज्यात ग्रीन हायड्रोजन ऊर्जा निर्मिती क्षेत्रात बुस्ट मिळणार आहे. या कार्यक्रमाला राज्यातील विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी उपस्थित होते, तर सभागृहात अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, महाराष्ट्र ऊर्जा विकास संस्थेच्या महासंचालक कादंबरी बलकवडे, मुख्यमंत्र्यांचे सल्लागार मनोज सौनिक, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव श्रीकर परदेशी आदींसह विकासक उपस्थित होते.

# ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त विशेष लेख.




८ मार्च हा जागतिक महिला दिन म्हणून जगभर साजरा केला जातो. जगभरातील स्त्रियांचा सन्मान म्हणून हा दिवस सर्वत्र साजरा केला जातो. अमेरिका यूरोप सारख्या देशात याची सुरुवात झाली होती. याचं लोन भारतात येण्यास बराच कालावधी गेला,१९४१ मध्ये मुंबई येथे प्रथम हा दिवस भारतात साजरा झाला. असं असलं असली तरी भारतात मात्र महिलांना सहजासहजी सामाजिक धार्मिक आर्थिक स्वातंत्र्य मिळालेलं नाही.जगभरातील स्त्रियांच्या संघर्षाचा विचार केला, दुःखाचा विचार केला तर भारतीय स्त्रियांना जो त्रास दुःख,अन्याय,अत्याचार सहन करावा लागला तेवढा इतर देशातील स्त्रीयांना करावा लागला नाही. कारण भारतीय स्त्रियांना धार्मिकग्रंथाचा (मनुस्मृती ) आधार घेऊन गुलामीच्या खाईत ढकललं गेलं होत.स्वातंत्र्याचे सर्व अधिकार तिच्या पासून हिरावून घेतले गेले होते.

भारतीय स्त्रियांना घरचा उंबरठा ओलांडून बाहेर पडण्याचा सुद्धा अधिकार नव्हता.चूल आणि मुल या अवस्थेत भारतीय स्त्री जीवन जगत होती.परकीय आक्रमणा मध्ये सुद्धा भारतीय स्त्रियांना अन्याय अत्याचार सहन करावे लागले होते.भारतीय स्त्रियांच्या जीवनावरील आधारित इतिहासाबद्दल जाणून घेतलं तर प्रत्येकाच्या अंगावर काटा उभा राहिल्या शिवाय राहणार नाही.अश्या परिस्थिती मध्ये भारतीय स्त्रियांनी जीवन जगलेलं आहे.परंतु क्रांती प्रतिक्रांती या गोष्टी समाज जीवनात ठरलेल्या असतात,बदल हा निसर्गाचा नियम आहे असं म्हटलं जातं,अन्याय अत्याचाराच्या विरोधात उठाव होणारच, गुलामीच्या विरोधात संघर्ष उभा राहणारच यात काही दुमत नाही. मोठ मोठ्या राजांच्या सत्ता सुद्धा लोकांनी उलथून टाकलेल्या आहेत.

इतिहासाची पाने उघडून पाहिली तर हा क्रांतीचा इतिहास आपल्याला पहायला मिळतोच. अशीच क्रांती भारतीय स्त्रियांच्या जीवनात घडून आली ती १८ व्या १९ व्या शतकात, खरंतर त्याला क्रांतीची ठिणगी असंही म्हणता येईल. वारकरी परंपरा असो कि छत्रपती शिवाजी महाराजांच स्वराज्य असो. या मध्ये महिलांचा मानसन्मान करण्यास सुरुवात झाली होती. महिलांवरील अन्याय अत्याचाराच्या विरोधात न्याय मागण्याचा अधिकार निर्माण झाला होता, शिवरायांच्या अगोदर दोन हजार वर्षा पूर्वीचा विचार केला तर बुद्धांनी सुद्धा भिक्खू संघात महिलांना स्थान दिलं होतं.बुद्धांच्या नंतर आणि शिव स्वराज्याच्या अगोदर पुन्हा महिलांना धर्म ग्रंथाच्या आधारावर गुलाम बनवण्याच काम झालच होतं.

शिव स्वराज्यात महिलांना मोकळा श्र्वास घेता येत होता, परंतु महाराजांनंतर पुन्हा भारतीय स्त्रियांच्या वाट्याला दुःखच आलं. परंतु १९ व्या शतककात मात्र भारतीय स्त्रियांच्या जीवनात एक नवीन क्रांती झाली, फुले शाहू आंबेडकर यांनी भारतीय स्त्रियांना खऱ्या अर्थाने मोकळा श्र्वास घेता यावा , स्वातंत्र्याचे अधिकार मिळावेत, शिक्षण मिळावं, माणूस म्हणून मानसन्मान मिळावा, चूल आणि मुल याच्या पलीकडे जाऊन तिला ही सामाजिक धार्मिक स्वातंत्र्य मिळावं या साठी महात्मा फुले सावित्रीमाई फुले शाहू महाराज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जी क्रांती घडवून आणली त्या क्रांतीमुळेच भारतीय स्त्रियांच्या जिवनात मोठा बदल झाला.

आज भारतीय स्त्रिया सर्वच क्षेत्रामध्ये प्रगती करताना ज्या दिसत आहेत त्या मागे माँसाहेब जिजाऊ, राजमाता अहिल्यादेवी होळकर, सावित्रीमाई फुले, माता रमाई तसेच वारकरी परंपरा, फुले शाहू आंबेडकर यांच्या मुळेच.

महात्मा फुले व सावित्रीमाई फुलेंनी स्त्री मुक्तीची चळवळ सुरु केली,१८४८ साली मुलींची पहिली शाळा पुणे येथे सुरु केली.

मुलींना ही शिक्षण मिळावं मानवतेचे हक्क अधिकार मिळावेत या साठी फुले दाम्पत्यांनी खूप मोठा संघर्ष केला.

पुढे संविधानाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिलांना घटनात्मक सुरक्षाकवच बहाल केलं. महिलांना मतदानाचा अधिकार दिला, निवडणुका लढवण्याचा अधिकार दिला, सरपंचापासून ते पंतप्रधान पदापर्यंत मजल मारण्याचा अधिकार दिला. वरील महापुरुषांच्या संघर्षामुळे खऱ्या अर्थाने भारतीय स्त्रियांना मानवतेचे अधिकार मिळालेले आहेत.एक स्त्री म्हणून तिचा अनादर न करता जिच्या पोटात आपण वाढलो जिने आपल्याला जन्म दिला लहानाच मोठं केलं म्हणून तिच्या प्रती आपल्या मनात नेहमीच आदर असला पाहिजे. आपल्याच माता भगिनींना आपण आदर सन्मान दिला पाहिजे. याच या महिला दिनाच्या शुभेच्छा. धन्यवाद..

**-परमेश्वर बनकर,**
**व्याख्याते, लेखक बीड ९५०३२८८२८२**

## प्रकाश आंबेडकरांच्या नव्या ..

भूमिकेत आहोत. पुढे होणाऱ्या बैठकीत आम्ही सहभागी होऊ, त्यात काय ठरते ते पाहून निर्णय घेऊ.

वंचित भाजपाची बी टीम आहे का? असे आरोप नेहमी होत असतात. याबद्दल प्रश्र्न विचारला असता प्रकाश आंबेडकर म्हणाले, आम्ही या प्रश्र्नावर कुणाला उत्तर देण्यासाठी मोकळे नाही. ज्यांनी भाजपाबरोबर याआधी सत्ता स्थापन केलेली आहे. त्यांनी आपण धुतल्या तांदळासारखे आहोत, असे दाखवू नये. आता ते धुतल्या तांदळेसारखे झाले आहेत, म्हणूनच आम्ही प्रस्ताव दिला आहे की, तुम्ही यापुढे भाजपा बरोबर जाणार नाहीत, असे मतदारांना लिहून द्या. जर मतदारांना असे लेखी उत्तर दिले, तर मतदार पाठिंबा देईल. अन्यथा मतदारांना जो अर्थ काढायचा तो ते काढतील. दरम्यान वंचित बहुजन आघाडीच्या सभेत बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले की, आम्ही अजून आघाडीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतलेला नाही. तीन पक्षांचे भांडण संपल्यानंतर आमच्याशी चर्चा सुरू होईल. अद्याप त्यांचीच भांडणे संपलेली नाहीत तर मग आमच्याशी काय चर्चा होणार आहे. १२ ते १६ मार्चपर्यंत आचारसंहिता लागू होण्याची शक्यता आहे. यांची भांडणे संपतील आणि ते आमच्यासोबत चर्चेला बसतील अशी अपेक्षा आहे.

## नागपुरात हजारो कोंबड्यांना

राज्य शासनाच्या प्रादेशिक अंडी उबवणी केंद्राच्या एक किमी परिसरात पशुवैद्यकीय विद्यापीठाचेही कुक्कुटपालन केंद्र असून तिथल्याही २६० कोंबड्यांना मारण्यात आल्याची माहिती आहे.

नागपूर प्रादेशिक अंडी उबवणी केंद्रातील कोंबड्यांचे मृत्यू बर्ड फ्लूमुळे झाल्याचे निदान झाल्याने त्याचा प्रसार रोखण्यासाठी जिल्हादंडाधिकारी व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. विपीन इटनकर यांनी उपाययोजना जाहीर केल्या आहेत. त्यानुसार कुक्कुट शेड निर्जंतुकीकरणासह बाधित क्षेत्रातील कुक्कुट पक्षी खाद्य खरेदी, वाहतूक, बाजार, जत्रा, प्रदर्शन आयोजित करण्यास पुढील २१ दिवसांपर्यंत प्रतिबंधही लागू केले आहेत. केंद्र शासनाच्या अधिनियमानुसार जिल्हात शिघ्र कृती दलाची स्थापना करण्यात आली. आतापर्यंत ८ हजार ५०१ पक्षी व १६ हजार ७७४ अंडी तसेच ५ हजार ४०० किलो पक्षी खाद्य शास्त्रोक्त पद्धतीने नष्ट करण्यात आले.

# मनरेगाच्या माध्यमातून नागरिकांची समृद्धीकडे वाटचाल : राज्यपाल रमेश बैस



पालघर : आदिवासी भागात 'प्रत्येक हाताला काम' देण्याची आवश्यकता आहे. काम करताना सिंचनाची सोय म्हणजेच 'प्रत्येक शेताला पाणी' उपलब्ध करून दिले, तर मनरेगामार्फत अधिक चांगले काम होऊ शकते. अनेक गावांत मनरेगाअंतर्गत विविध कामे होत आहेत. मनरेगाच्या माध्यमातून नागरिकांची समृद्धीकडे वाटचाल सुरु असल्याचे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी केले. विक्रमगड तालुक्यातील विकसित गाव खोमारपाडा येथील विकासकामांच्या पाहणीवेळी राज्यपाल बोलत होते. यावेळी राज्यपाल श्री. बैस यांनी गावकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम, खासदार राजेंद्र गावित, मनरेगाचे संचालक नंदकुमार,जिल्हाधिकारी गोविंद बोडके पोलीस अधिक्षक बाळासाहेब पाटील,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे तसेच वरिष्ठ अधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.

राज्यपाल श्री. बैस म्हणाले की, मिशन मनरेगाचे संचालक नंदकुमार यांनी मला सांगितले होते की मनरेगाच्या माध्यमातून प्रत्येक कुटुंब समृद्ध होऊन करोडपती होऊ शकते.सुरुवातीला माझा विश्र्वास बसला नाही. पण खोलवर विचार केल्यावर असे लक्षात आले की एकदा सिंचनासाठी पाण्याची व्यवस्था केली की ते पाणी शास्त्रोक्त पद्धतीने वापरणे शक्य आहे. अशा प्रकारे गावाचा विकास होईल. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. सर्व गावे विकसित झाली तरच 'विकसित भारत' होईल. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रधानमंत्र्यांनी विकसित भारत संकल्प यात्रा सुरू केली आहे, जी देशातील सर्व गावे व्यापत आहे.

भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनाच्या विविध विकास योजना अपेक्षित लाभार्थ्यांपर्यंत का पोहोचत नाहीत हे प्रथमच समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

जिल्हास्तरावर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना प्रेरित करण्यात विकास भारत संकल्प यात्रा यशस्वी होत असून विविध योजनांचा लाभ लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याचे राज्यपाल श्री.बैस यांनी सांगितले.

गेल्या १० वर्षात भारत सरकारने शेतकरी सक्षमीकरणाला प्राधान्य दिले आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणे, त्यांना तंत्रज्ञानानुकूल बनवणे, कृषी संशोधन आणि शिक्षणाला चालना देणे आणि शेतीशी संबंधित पायाभूत सुविधा निर्माण करणे इत्यादी कृषी क्षेत्राच्या विकासासाठी आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी उद्दिष्टे निश्र्चित करण्यात आली होती.

तंत्रज्ञानापासून पीक विम्यापर्यंत, आधुनिक सिंचन पद्धतींपर्यंत सहज कर्ज उपलब्ध करून देणे, सरकार शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी सर्वसमावेशक कृती योजना राबवत आहे. प्रत्येक कुटुंबाला करोडपती बनवण्याची कल्पना अशक्य वाटली. पण खोमारपाडा सारख्या अत्यंत दुर्गम, मागास आणि आदिवासी भागात हे शक्य झाले असेल तर ते कुठेही नक्कीच शक्य होऊ शकते माझ्या माहितीनुसार, देशातील हे पहिले गाव असेल जिथे मनरेगाचा वैयक्तिक लाभ घेऊन बहुतेक नागरिक समृद्धीकडे वाटचाल करत आहेत. त्यामुळे आता आदर्श उदाहरण म्हणून खोमारपाडा गाव पुढे येत असल्याचे राज्यपाल श्री.बैस यांनी सांगितले.

प्रत्येक हाताला काम, प्रत्येक शेतात पाणी, प्रत्येक जलस्रोतासाठी सौर पंप, प्रत्येक शेतात ठिबक सिंचन या चार सूत्रांची अंमलबजावणी केल्यास आदिवासी भागातही शेतीचे उत्पन्न केवळ 'दुप्पट' नाही तर 'तिप्पट'ही करणे शक्य आहे.आदिवासी भागात कुपोषण ही मोठी समस्या आहे.

महाराष्ट्रातून आणि भारतातून कुपोषणाचे उच्चाटन केले पाहिजे. आजूबाजूच्या सर्व गावांचा कायापालट करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. लोकांच्या स्थलांतराच्या कारणांचा अभ्यास करून धोरण आखून समस्या सोडवून स्थानिक भागात रोजगार निर्मिती करण्यात येणार आहे.

राज्यघटनेने अनुसूचित क्षेत्राच्या विकासाची विशेष जबाबदारी राज्यपालांवर टाकली असल्याचे राज्यपाल श्री.बैस यांनी सांगितले.

# राज्यात उन्हाच्या झळा, पारा ३८ अंशांवर; सोलापुरात सर्वाधिक ३८.६ अंश सेल्सिअसची नोंद

पुणे/प्रतिनिधीः राज्यात उन्हाच्या झळा वाढल्या आहेत. गेल्या दोन दिवसांपासून कमाल तापमान ३८ अंश सेल्सिअसवर गेले आहे. गुरुवारी सोलापुरात सर्वाधिक ३८.६, तर यवतमाळमध्ये ३८.२ अंश सेल्सिअसची नोंद झाली आहे. बुधवारच्या तुलनेत गुरुवारी कमाल तापमानात सरासरी एक ते दीड अंशाने वाढ झाली आहे.

उत्तरेकडून येणारा थंड हवेचा प्रवाह क्षीण झाल्यामुळे कमाल-किमान तापमानात वाढ झाली आहे. अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरावरून येणाऱ्या बाष्पयुक्त वाऱ्याचे प्रमाण कमी झाल्यामुळे अवकाळीचे ढगही विरले आहेत. राज्यभरात हवामान कोरडे आहे. आकाश ११ मार्चनंतर अंशतः ढगाळ राहण्याचा अंदाज आहे. दहा मार्चनंतर तापमानात अर्धा ते एक अंश सेल्सिअसने वाढ होण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.गुरुवारी राज्याच्या बहुतेक भागात ३५ अंश सेल्सिअसहून अधिक तापमानाची नोंद झाली आहे. विदर्भातील अकोला, अमरावती, ब्रह्मपुरी, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, वर्धा, वाशिम; मराठवाड्यातील नांदेड, परभणी, उदगीर; मध्य महाराष्ट्रात जेऊर, कोल्हापूर, मालेगाव, पुणे, सातारा येथे कमाल तापमान ३५ अंशांच्या वर गेले होते.

राज्यात गुरुवारी सर्वांत कमी ११.३ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद पुण्यात झाली. मुंबईसह किनारपट्टीवर अनेक ठिकाणी पहाटे गारवा जाणवत आहे. लेह, लडाखमध्ये १० व १२ मार्च रोजी पुन्हा थंड हवेचे दोन झंझावात सक्रिय होण्याचा अंदाज आहे. महाराष्ट्रावर त्याचा फारसा परिणाम होण्याची शक्यता नाही. हवामान कोरडे राहून पहाटे थोडीशी थंडी जाणवू शकते, अशी माहिती निवृत्त हवामान शास्त्रज्ञ माणिकराव खुळे यांनी दिली आहे.

जागतिक हवामान संघटनेने एल-निनोमुळे जगाच्या विविध भागांत उष्णतेच्या लाटा येण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. प्रशांत महासागरातील एल-निनोची स्थिती उन्हाळाभर कायम राहून, जूनमध्ये एल-निनो निष्क्रिय होण्याचा अंदाज आहे. त्यामुळे भारतात यंदाच्या उन्हाळ्यात तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याचा आणि उष्णतेच्या झळांची तीव्रता वाढण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. एल-निनोमुळे जून २०२३पासून आजवरचे सर्व महिने सरासरीपेक्षा उष्ण ठरले आहेत, अशी माहिती जागतिक हवामान संघटनेचे सरचिटणीस सेलेस्टे साऊलो यांनी दिली आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble



# प्रशासन सुस्त... नागरिक मात्र त्रस्त,...
# प्रभाग क्रमांक तीन मध्ये घाणीचे साम्राज्य बा विठ्ठला..!
## मुख्याधिकाऱ्यांना नागरिकांची सेवा करण्यासाठी सद्बुद्धी दे...

## महाशिवरात्री निमित्य बारा ज्योर्तिलिंग मंदिरात कार्यक्रम

अक्कलकोट/प्रतिनिधीः सुभाष गल्ली येथील बारा ज्योतिर्लिंग मंदिरामध्ये महाशिवरात्री निमित्त विविध धार्मिक कार्यक्रम पहाटे रुद्राभिषेक सकाळी ११ ते १२ वाजता शंकर-पार्वती विवाह सोहळा त्यानंतर सामुदायिक महाआरती भजन व सायंकाळी चार वाजता रूद्रायाग व रुद्राभिषेक असे विविध धार्मिक कार्यक्रमाने महाशिवरात्रीच्या उत्सवानिमित्त बारा ज्योतिर्लिंग मंदिरा मंदिरामध्ये घेण्यात येणार असल्याची माहिती मंदिराची मुख्य पुजारी सदाशिव शिवयोगी महाराज यांनी दिली . महाशिवरात्रीनिमित्त मंदिरामध्ये शिवलीलामृत या ग्रंथाचे पारायण चालू आहे याचे मुख्य वाचन कौसल्या जाजू , उज्वला सरदेशमुख जंगालेताई आसावरी ग्राम यांनी केले . दिनांक ९ मार्च रोजी भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले . आहे प्रसादाचा लाभ भाविकांनी घ्यावा असे आवाहन बारा ज्योर्तिलिंग मंदिराचे पुजारी सदाशिव शिवयोगी महाराज यांनी केले आहे

पंढरपूर/राजेंद्र कोरके पाटील : पंढरपूर नगरपालिका मध्ये प्रभाग क्रमांक तीन मधील मटन मार्केट येथील गटारीवरील चेंबर कायम तुटलेले असतात या ठिकाणी माणसांना येणाऱ्या जाणाऱ्यांसाठी त्याची घाण पाण्यातून यावे जावे लागते संपूर्ण परिसरामध्ये घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे असे असताना सुद्धा प्रशासन सुस्त व जनता घाणीचे त्रस्त वार्ड क्रमांक तीन मधील मटन मार्केटमध्ये रहिवाशांना देण्याचा वापर मोठ्या प्रमाणात त्रास होत असून त्याचा त्याचबरोबर मटन खरेदीसाठी येणाऱ्या पंढरपूरचा अथवा घाणीचे उग्र वासाचा सामना करावा लागत आहे त्याकडे नगरपालिकेचे प्रशासनाने म्हणावे तसे नक्षणे दिल्यामुळे समस्या उदबत आहे सदर व तक्रार जनतेचे जनतेने पक्षीय कार्यकर्त्याकडे दाखल केली असता प्रशासन राजवट असल्याने आमची काहीही चालत नाही असे पुढाऱ्यांकडून आडवा पूर्वीची उत्तरे देण्यात येत आहेत वारंवार तक्रार देऊन सुद्धा पंढरपूर नगरपाल प्रशासन नागरिकांच्या प्रचारक कायम दुर्लक्ष करत आहे त्यामुळे सोलापूर जिल्हा ओबीसी विभाग यांच्यामार्फत महिला नागरिकांना घेऊन निवेदन देण्यात आले

चेंबर तोंडी फुटल्याने असल्यामुळे माध्यमातून महिला मिश्रित पाणी बाहेर येत आहे ती पाणी सर्वत्र पसरते व त्याचा पाण्यामधून सर्वत्र नागरिकांना यावे जावे लागत याशिवाय पिण्याचे पाण्याचे नळ बाहेर असल्यामुळे त्या नळांना सुद्धा महिला निश्रिचत पाणी येत असल्यामुळे सर्व नागरिकांचे आरोग्य धोक्यात आहे वारंवार येथील नागरिकांनी लहान मुले आजारी पडतात तिथे कोणतेही लक्ष देत नाही तर लवकरात लवकर या दुर्गंधी मुक्त पाण्याचा बंदोबस्त नाही केला तर सोलापूर जिल्हा काँग्रेसच्या



वतीने विरुद्ध तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे प्रभाग तीन मधील नागरिकाकडून नगरपालिकेच्या प्रशासन कार्यालयात दुर्गंधीयुक्त महिलांनी खरीप पाणी मुख्याधिकारी यांच्या दानात आणून सर्वत्र टाकल्याशिवाय राहणार नाही अशी निवेदन सोलापूर जिल्हा ओबीसी विभाग यांच्यामार्फत करण्यात आले यावेळी मा सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटी ओबीसीचे विभाग अध्यक्ष समीर पोळी महाअंप सारख्या राष्ट्रवादी साठी उबेद शेख बाळासाहेब आजबे काँग्रेस सोशल मीडिया पंढरपूर मंगळवेढा अध्यक्ष शिवाजी राजे धोत्रे व सर्व महिला नागरिक उपस्थित होते

# मोहोळ येथील पाणी प्रश्न सोडवण्यासाठी राजू खरे यांचाच मोठा हातभार खरे यांनी सिद्धार्थ नगर मधील पाणी टाकीची केली उद्घाटन



पंढरपूर/राजेंद्र कोरके पाटीलः२४७ मोहोळ राखीव विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेची संभाव्य उमेदवार राजाभाऊ खरे यांच्या माध्यमातून मोहोळ शहरातील सिद्धार्थनगर येथील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला आहे त्यावेळी मोहोळ शहरातील यांच्या कार्याचे कौतुक केले जात आहे

खरे खरे परिवाराने मोहोळ मतदार संघातील जयंतीसाठी मागील त्याला पाणी आणि मागितलेला रस्ता हे तत्व राबवण्याचा संकल्प घेतला आहे मोहोळ तालुक्यामध्ये अनेक महिन्यापासून पदरमोड करीत आणि विकास कामे हाती घेतली आहेत राजाभाऊ खरे यांच्या माध्यमातून मोहोळ शहरांमध्ये आज पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी मला यावेळेस त्या भागातील अनेक नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते त्यावेळेस तृप्ती ताई खरे बोलताना म्हणाल्या की मोहोळ शहरातील कोणत्याही अडचणी असू देत आम्ही त्या सोडवण्यास कटिबद्ध आहोत त्यामुळे या भागातील जनतेने आपल्या महत्त्वाच्या समस्या आमच्या समोर मांडाव्यात असे आव्हाने करण्यात आले

यावेळी आशाताई कांबळे पुष्पाताई बनसोडे जयश्री बनसोडे लक्ष्मी बनसोडे शोभा बनसोडे वर्षाताई बनसोडे सीमा बनसोडे राणी बनसोडे सारेगा बनसोडे दिपाली जगताप शोभा बनसोडे लेखिका बनसोडे निशा बनसोडे राणी बनसोडे सुरेखा बनसोडे लता क्षीरसागर मंगल शिरसागर कापुरे बनसोडे राजाभाऊ खरे यांचे बंधू विजय खरे चंदनशिवे सरपंच पांडुरंग परकाळे वफापुरी सरपंच अरुणा बनसोडे पांडुरंग डोंगरे समाधान बाबर यांच्यासह मोहोळ शहरातील नागरी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

# आ. प्रणिती शिंदे यांचा गावाकड दौरा दरम्यान पाटकळ बैठकीस सकल मराठा समाज युवकांनी विरोध केला

पंढरपूर/राजेंद्र कोरके पाटील :लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मुंबई येथे सोलापूर जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची बैठकीत बैठकीत करण्यात आली होती सदर बैठकीमध्ये सोलापूर सर्व जिल्ह्याचा आढावा घेण्यात आला यापूर्वी सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटी आ. प्रणिती शिंदे यांना उमेदवारी मिळवण्यासाठी ठराव घेतला होता त्या अनुषंगाने मुंबईमधील बैठकीसाठी आमदार प्रणिती ताई शिंदे यांचे नाव सोलापूर लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी मिळवण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने अखिल भारतीय काँग्रेस कमिटी यांच्याकडे एक मतांनी आई कमांड कडे पाठवण्यात आले आहे त्या अनुषंगाने आ. प्रणिती शिंदे यांना लोकसभेची उमेदवारी देण्यासाठी सर्वांचे एकमत एकमत झाले.तसेच या बैठकीमध्ये सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष ड्रॉ धवलसिंह मोहिते पाटील उपस्थित होते एका प्रकरणांमध्ये सध्या त्यांना जामीन मिळवण्यासाठी सुप्रीम कोर्ट घेतली आहे त्यामुळे त्यांचे सुप्रीम कोर्टातील प्रकरण पूर्ण होईपर्यंत सोलापूर जिल्हा अध्यक्ष पदाचा पदभार जिल्हा राहुल कोलगे तुम्ही शिकारावा असे महाराष्ट्र प्रदेश समितीचे अध्यक्ष आ. नानाभाऊ पटेल यांनी बैठकीत सांगितले असता त्यास राहुल कोळी यांनी सहमती दर्शवली

त्यामुळे आता आगामी काळात निवडणुकीच्या दृष्टीने सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटी



चे प्रभारी अध्यक्षपद राहुल यांच्याकडे देण्याची शक्यता आहे त्यांनी नेहमी शेतकरी व कामगार विविध सामाजिक प्रश्नावर आवाज उठवून काँग्रेसचा विचार ध्येय धोरणे तळागाळात पोचवण्याची काम केलेली आहे करत आहेत त्यामुळे त्यांच्यावर प्रदेशाध्यक्ष आमदार पटोले यांनी मोठी जबाबदारी मिळत असलेली संकेत दिले आहेत त्यावेळी विजयकुमार हातोरे काका कुलकर्णी भीमराव गवळी सर मुले शेतकरी सर रमेश हसापुरे राधाकृष्ण पाटील ओबीसी जिल्हाध्यक्ष रुपनर आधी पदाधिकारी उपस्थित होते

# उत्तम जानकर यांच्या विरोधात सकल हिंदू खाटीक समाज आक्रमक
## सोलापूर अनुसूचित जाती राखीव मतदार संघातून उमेदवारी दिल्यास मोठा फटका बसेल !

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर लोकसभा मतदार संघ हा अनुसुचीत जाती प्रवर्गासाठी राखीव मतदार संघ असून सामाजिक द्रष्ट्या मागास अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव असलेल्या या मतदार संघातून भाजप कडून उत्तम जानकर हे हिंदू खाटीक या जात दाखल्याच्या आधारे लोकसभा निवडणूक लढविणार असल्याची चर्चा होत आहे. वास्तविक पाहता उत्तम जानकर यांच्याकडे जरी हिंदू खाटीक जाता प्रमाणपत्र असले तरी त्यांचा आणि हिंदू खाटीक समाजाचा दुरान्वयेही कधी संबध आला नाही.सदर राजकीय नेते उत्तम जानकर आणि आमच्या हिंदू खाटीक समाजात कधीही संपर्क नसून त्यांचा किवा त्यांच्या पुर्वजांचा आमच्या हिंदू खाटीक समाजाशी समाज परंपरेने कधीही रोटी-बेटी व्यवहार झालेला नाही,उलट उत्तम जानकर हे गृहस्थ धनगर समाजाचे नेते म्हणून राज्यात ओळखले जात आले आहेत.



उत्तम जानकर यांचा आणि आमच्या हिंदू खाटीक समाजाचा सगे सोयरे या नात्याने दुरान्वयेही संबंध नाही.ते खोटे कागदपत्रे हस्तगत करीत राजकीय लाभ उठविण्याच्या हेतूने आमच्या जातीचे असल्याचे सिध्द करु पहात आहेत.त्यामुळे उत्तम जानकर यांच्या विषयी आमच्या हिंदू खाटीक जातीत कमालीचा संताप व्यक्त होत आहे.तरी सदर उत्तम जानकर यांना अनुसुचीत जाती हिंदू खाटीक जात दाखल्याच्या आधारे उमेदवारी देऊ नये अशी मागणी सकल हिंदू खाटीक समाजाच्या पदाधीकाऱ्यांनी आज भाजपचे जिल्हाध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची भेट घेत निवेदना द्वारे केली आहे.

हिंदू खाटीक समाजाचा सगे सोयरे या नात्याने दुरान्वयेही संबंध नाही.ते खोटे कागदपत्रे हस्तगत करीत राजकीय लाभ उठविण्याच्या हेतूने आमच्या जातीचे असल्याचे सिध्द करु पहात आहेत.

त्यामुळे उत्तम जानकर यांच्या विषयी आमच्या हिंदू खाटीक जातीत कमालीचा संताप व्यक्त होत आहे.सोलापूर जिल्हयात हिंदू खाटीक समाजाचे सुमारे १ लाख र मतदार आहेत.जर भाजपकडून हिंदू खाटीक या जात दाखल्याच्या आधारे उत्तम जानकर यांना उमेदवारी दिली गेल्यास त्याचा मोठा फटका भाजपास बसेल असा इशाराही देण्यात आला आहे.हिंदू खाटीक समाजातील ७ वर्षाच्या बालिकेवर अत्याचाराची घटना नुकतीच लातूर जिल्ह्यात घडली होती.राज्यभरात हिंदू खाटीक समाजाने निषेध मोर्चे काढले तेव्हा उत्तम जानकर हे मौन बाळगून होते,ते समाजाच्या या आक्रोशात का सहभागी झाले नाहीत असा सवालही उपस्थित करण्यात आला.

हिंदू खाटीक समाजाच्या वतीने भाजपचे जिल्हाध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी याना समाजाच्या शिष्टमंडळाने प्रत्यक्ष भेटून निवेदन दिले आहे तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, भाजपचे प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे,पालकमंत्री चंदकांत पाटील आदींनीही निवेदने पाठविण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली.याच बरोबर सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयात देखील निवेदन देण्यात आले.

यावेळी अध्यक्ष राजेंद्र ताठे,उपाध्यक्ष सतीश खडके,सचिव राजेश ताठे,कार्याध्यक्ष भीमाशंकर इंगोले,खजिनदार शामराव बेदरे,अनिल इंगोले,गणेश जवारे,रवींद्र इंगोले,गणेश ताठे,संतोष ताठे,सुभाष जवारे,रमेश ताठे,सुनील ताठे,सुनील खडके,सागर खडके,सूरज खडके,अनिल खडके,सतीश जवारे,वैभव इंगोले,शुभम ताठे,विशाल इंगोले,संजय ताठे,विकी ताठे,प्रज्वल खडके,नितीन खडके,विश्र्व्जीत इंगोले,हरिकिशन इंगोले,अशोक ताठे,शशी ताठे,प्रवीण खडके,रोहित ताठे,उमेश ताठे,नागेश ताठे,रोहित ताठे,अभिजित ताठे,धनंजय सदानंदे,प्रेमचंद हाताळे यांच्यासह समाज बांधव उपस्थित होते.

# मनोरंजन विश्वाच्या समस्या सोडविण्यासाठी राज्य शासन सकारात्मक : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई : मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीसमोर काही आव्हाने असली तरी मनोरंजन विश्र्वाच्या सर्व समस्या सोडविण्यासाठी राज्य शासन सकारात्मक आहे. मुंबईतील चित्रनगरीचे मेकओव्हर राज्य शासन करणार आहे, जगाला हेवा वाटेल अशी चित्रनगरी आपण करू. चित्रपट ही मोठी इंडस्ट्री आहे, महाराष्ट्रातील कलाकार संस्कृती पुढे नेण्याचं काम करीत असल्याने सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

महाराष्ट्र टाइम्सच्या वतीने 'मटा सन्मान २०२४' पुरस्कार प्रदान सोहळा विले पार्ले येथील मुकेश पटेल सभागृह येथे आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्र टाइम्सचे समूह संपादक पराग करंदीकर यांची यावेळी व्यासपीठावर उपस्थिती होतीमुख्यमंत्री श्री. शिंदे आणि उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते मटा सन्मान महाराष्ट्र भूषण पुरस्कार ज्येष्ठ गायिका पद्मभूषण सुमन कल्याणपूर यांना, वसुंधरा साथी सन्मान पुरस्कार बीजमाता राहीबाई पोपेरे यांना आणि युथ आयकॉन सन्मान शास्त्रीय गायक महेश काळे यांना प्रदान करण्यात आला.यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, महाराष्ट्र टाइम्स सतत २४ वर्षे उत्कृष्ट कलाकृतींचा आणि गुणवंत कलावंतांचा गौरव करत आहे. ही अभिनंदनीय गोष्ट आहे. पत्रकारितेमध्ये ६-७ दशकांहून अधिक काळ कार्यरत असलेल्या मटाने मराठी वाचकांच्या मनात हक्काचे स्थान निर्माण केले आहे. विविध उपक्रमातून महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक प्रगतीत म.टा. ने महत्त्वाचे योगदान दिल्याचे त्यांनी सांगितले.

या सोहळ्यात सुमनताईंना महाराष्ट्र भूषण हा पुरस्कार देण्याचे भाग्य आम्हा दोघांना लाभले, असे सांगून मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, सुमनताईंच्या आवाजात आपण अनेक सुमधुर गाणी ऐकली. त्यांची गाणी आणखी हजारे वर्षे अशीच ताजीतवानी वाटणार आहेत. तसेच तरुण पिढीपर्यंत भारतीय शास्त्रीय संगीत पोहोचवण्यात महेश काळे यांचे मोठे योगदान आहे. केवळ भारतातच नव्हे तर विदेशातही ते शास्त्रीय संगीताचा प्रसार करून खऱ्या अर्थाने कला संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाचे दूत बनले आहेत, अशा शब्दात त्यांनी महेश काळे यांचा गौरव केला.ते म्हणाले, राहीबाई पोपेरे यांना 'वसुंधरा साथी सन्मान' दिला आहे. हा पुरस्कार महाराष्ट्र टाइम्स आणि महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळातर्फे दिला जातो. पर्यावरण जागृतीसाठी व्यासपीठ म.टा.ने उपलब्ध करून दिले. बीजमाता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राहीबाई यांचं कर्तृत्व मोठं आहे. त्यांनी हायब्रिडविरुद्ध लढा उभारला आणि देशी बियाण्यांचा प्रसार केला. कोणतीही शैक्षणिक पदवी नसली तरी त्या सगळ्यांना डिग्री देणाऱ्या ठरल्या आहात, अशा शब्दात त्यांनी राहीबाईंचे कौतुक केले.

राहीबाई यांनी विषमुक्त शेतीसाठी जे काम सुरू केले आहे त्यासाठी शासन त्यांच्याबरोबर आहे. राज्य सरकारने १२१ सिंचन प्रकल्पांना मान्यता दिली आहे. १५ लाख हेक्टर जमीन ओलिताखाली येणार आहे, अशी माहितीही यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिली.

विष मुक्त शेती अभियान राज्यात सुरु सुरांच्या दोन पिढ्यांचा आज सन्मान

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मटा सन्मान पुरस्कार देऊन आम्ही सन्मानित झालो ही भावना मनामध्ये आहे. बीजमाता राहीबाई यांचे काम ही सर्वात मोठी सेवा आहे. आपण सध्या जल वायू प्रदूषणामुळे आरोग्य विषयक प्रश्र्नांना सामोरे जात आहोत. कॅन्सर रुग्ण वाढत आहेत. विषयुक्त अन्न हे याचे मूळ कारण आहे. ते दूर करण्यासाठी राहीबाई प्रयत्न करत आहेत. त्यासाठी जनजागृतीचे काम त्या करत आहेत.राज्य शासनाने विषमुक्त शेती मिशन सुरू केले आहे. राज्यातील २५ लाख हेक्टर शेती विषमुक्त करण्याचे उद्दिष्ट्य आपण ठेवले आहे. यासाठी काम सुरू झाले असल्याची माहिती श्री. फडणवीस यांनी दिली.आजच्या मटा सन्मान सोहळ्यात सुरांच्या दोन पिढ्यांचा सन्मान आज केला गेला आहे, असे सांगून उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, सुमनताई यांची गाणी अजरामर आहेत. त्यांनी १३ विविध भाषेत गाणी गायली. देवघरात तेवणारा दिवा त्याप्रमाणे सुमनताईंचे गाणे असल्याचे ते म्हणाले. महेश काळे यांनी अभिजात संगीताच्या माध्यमातून नवीन पिढीला शास्त्रीय संगीताचे वेड लावले. जगातील वेगवेगळ्या देशात हे संगीत नेले, असे कौतुकोद्गार त्यांनी काढले.

# सीमा भाग तडवळ येथे वंचित बहुजन युवक आघाडी शाखा उद्‌घाटन समारंभ संपन्न




सोलापूर/प्रतिनिधीः सर्व वंचित, उपेक्षित, अन्यायग्रस्त समाजाला न्याय मिळवून देणारे वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नातू मा.प्रकाशजी आंबेडकर साहेब यांची झंजावत कार्य पाहून सीमाभाग म्हणून ओळखले जाणारे तडवळ येथे अन्यायाविरुद्ध वाचा फोडण्यासाठी तडवळ येथे जिल्ह्यातील व तालुक्यातील तसेच वरिष्ठ मान्यवरांच्या हस्ते शाखा उद्धाटन समारंभ थाठामाठात संपन्न झाला . तसेच वरिष्ठ मान्यवर भाषणात बोलताना म्हणाले की हा पक्ष एका जातीचा नसून अनेक जातीला सोबतीला घेऊन जाणारा पक्ष आहे तसेच अन्यायाविरुद्ध लढा देऊन न्याय मिळवून देणारा पक्ष आहे. अशी मान्यवरांच्या मनोगतद्वारे व्यक्त करण्यात आले. त्यावेळी पांडुरंग खांडेकर(युवक जिल्हाध्यक्ष), अनिरुद्ध वाघमारे (जिल्हा महासचिव), रवी थोरात( युवक जिल्हा उपाध्यक्ष), जलिंदर चंदनशिवे(जिल्हा युवक संघटक), रविकांत रांजणीकर (जिल्हा संघटक), चंद्रशेखर मडीखांबे (तालुकाध्यक्ष), शिलामणी बनसोडे(युवक तालुकाध्यक्ष), सागर बनसोडे ,सोमनाथ बनसोडे (युवक तालुका उपाध्यक्ष), प्रदीप बनसोडे (युवक तालुका कार्याध्यक्ष), संदीप बाळशंकर (युवक शहराध्यक्ष), विशाल ठोंबरे (शहराध्यक्ष), बबन गायकवाड (तालुका संघटक), रवी पोटे (सम्यक विद्यार्थी संघटना राज्य प्रवक्ता ), शरण शिवशरण (शाखा अध्यक्ष ), यल्लपा गायकवाड (उपाध्यक्ष), अभय कांबळे (महासचिव),प्रदीप गायकवाड ( कार्याध्यक्ष), अनिल गायकवाड (सहसचिव), अप्पाशा मडीखांबे (कोषाध्यक्ष), किरण शिवशरण ( संघटक), संतोष कुंभार (सरपंच तडवळ) भिमण्णा ग्वाड्याळ,( उपसरपंच) श्रीशैल करजगी (तंटामुक्त अध्यक्ष), राम बनसोडे (ज्येष्ठ नेते), मल्लिकार्जुन गायकवाड (आधारस्तंभ), प्रा. बसवंत गायकवाड, रमेश मानशेट्टी, सोमनाथ दोड्याळ ,परमेश्र्वर कांबळे ,संजू परसप्पा गायकवाड, सुनील शिवशरण ,सुरेश शिवशरण, साहेबांना बनसोडे, अरुण गायकवाड तसेच असंख्य गावकऱ्यांच्या उपस्थित उद्धाटन सोहळा संपन्न झाला.

# अधिस्विकृतीधारक पत्रकारांना रेल्वे प्रवासाची सवलत पुर्ववत सुरू करण्याची मागणी

## केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांना भेटून बहुभाषिक साप्ताहिक संपादक, पत्रकार संघाचे निवेदन

बीड /प्रतिनिधी : अधिस्विकृती पत्रिका धारक पत्रकारांना बंद करण्यात आलेली रेल्वे प्रवासाची सवलत पुन्हा सुरु करण्याची मागणी बहुभाषिक साप्ताहिक संपादक, पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांना देण्यात आले आहे. ते बीड येथे बीड जिल्हयातील रेल्वे कामाच्या आढावा बैठकीसंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात आले होते. यावेळी त्यांची भेट घेवून सदरील निवेदन देण्यात आले. यावेळी बहुभाषिक साप्ताहिक संपादक, पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष शेख ताहेर, प्रदेशाउपाध्यक्ष सुनिल पोपळे, राज्य प्रसिध्दी प्रमुख शेख अब्दुल रहेमान, मराठवाडा उपाध्यक्ष नितेश उपाध्ये आदींची उपस्थिती होती.




बहुभाषिक साप्ताहिक संपादक,पत्रकार संघ
महाराष्ट्र राज्य
प्रदेशाध्यक्ष शेख ताहेर जाफर | प्रदेशउपाध्यक्ष सुनिल पोपळे | राज्य प्रसिद्धीप्रमुख शेख अब्दुल रहेमान
प्रति,
मा.ना.श्री.रावसाहेबजी दानवे साहेब,
केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री,
नवी दिल्ली.
विषय : अधिस्विकृती धारक पत्रकारांना रेल्वे प्रवासाची सवलत मोफत चालु करण्याबाबत.
प्रदेशाध्यक्ष शेख ताहेर जाफर | प्रदेशउपाध्यक्ष सुनिल पोपळे | राज्य प्रसिद्धीप्रमुख शेख अब्दुल रहेमान

भारतीय रेल्वे विभागाकडून पत्रकारांना रेल्वे प्रवासात तिकिटामध्ये ५० टक्के सवलत दिली जात होती. देशभरातील राज्य शासनाने अधिस्विकृती पत्रिका दिलेले पत्रकार या योजनेसाठी पात्र होते. प्रवासात सवलत असल्या ने वार्ता संकलनासाठी, विविध राजकीय कार्यक्रमासाठी जाण्यासाठी सवलतीचा मोठा फायदा पत्रकारांना होत होता. राज्य व केंद्र सरकारच्या विविध योजनांची प्रसिद्धी देण्यासाठी, विविध योजना लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी हे सोयीचे होते, असे निवेदनात म्हंटले आहे.

सन २०२० पासून रेल्वे विभागाने पत्रकारांची ही सवलत बंद केली आहे. त्यामुळे देशभरातील पत्रकारांना अडचणी निर्माण झाल्या आहेत. प्रवासात सवलत नसल्याने अनेक पत्रकार प्रवास करत नाहीत परिणामी सरकारी योजना, शासकीय कार्यक्रमाला जाण्यास अडचणी येत आहेत. सर्व बाबींचा विचार करून देशभरातील राज्य शासनाने अधिस्विकृती पत्रिका दिलेल्या पत्रकारांना पूर्वीप्रमाणे रेल्वे प्रवासात सवलत देण्याची मागणी बहुभाषिक साप्ताहिक संपादक, पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आली आहे. या निवेदनावर संपादक विलास डोळसे, अविनाश वाघिरकर, प्रचंड सोळंके, लक्ष्मण गायकवाड, आदींच्या स्वाक्षर्या आहेत.

# पंचायत समिती अक्कलकोट यांच्या वतीने गटविकास अधिकारी सचिन खुडे यांचा निरोप समारंभ !



अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट तालुक्याच्या विकासकामात मोलाचे सहकार्य करणारे गटविकास अधिकारी श्री. सचिन खुडे यांची सेवापूर्ती झाल्याबद्दल पंचायत समिती येथे निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी या ठिकाणी उपस्थित राहून सचिन खुडे यांचा स्वपत्निक सत्कार करून त्यांनी दिलेल्या सेवेबद्दल अक्कलकोट तालुकावाशिया कडून आभार व्यक्त केले. तसेच त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना आमदार कल्याणशेट्टी म्हणाले की,

राज्य शासन आणि पंचायत समिती यातील दुवा म्हणजे गटविकास अधिकारी. पंचायत समितीच्या प्रशासनावर मजबूत पकड ठेवून आपल्या अक्कलकोट तालुक्यात विकास कार्याची अंमलबजावणी करण्यासाठी त्यांनी समर्पित भावनेने कार्य केले. यावेळी पंचायत समितीचे दयानंद परिचारक, ग्रामसेवक संघटना तालुकाध्यक्ष अभय निलुरे, सर्व कार्यालयीन प्रमुख, कर्मचारी, ग्रामसेवक व पदाधिकारी कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कविटगाव येथे वंचित बहुजन युवा आघाडीच्या शाखेच उत्साहात उद्‌घाटन

करमाळा/प्रतिनिधी : वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय नेते आदरणीय ड. बाळासाहेब आंबेडकर तसेच प्रदेशाध्यक्ष निलेश जी विश्र्वकर्मा यांच्या आदेशाने गाव तिथे शाखा अंतर्गत कविटगाव तालुका करमाळा या ठिकाणी वंचित बहुजन युवा आघाडी सोलापूर (पश्र्चिम) जिल्हाध्यक्ष साहेबराव वाघमारे यांच्या हस्ते शाखा उद्धाटन मोठ्या उत्साहात संपन्न झाले

हलगी व फटाक्यांच्या आतिशबाजी करत स्वागत केले. वंचित बहुजन युवा आघाडी च्या नामफलकाचे उद्धाटन जिल्हाध्यक्ष साहेबराव वाघमारे व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले नंतर महापुरूषांच्या प्रतीमांना पुष्पहार अर्पण करून आलेल्या सर्व मान्यवरांचे स्वागत सत्कार करण्यात आला व कार्यक्रम संपन्न झाला❉

यावेळी जेष्ठ जिल्हा उपाध्यक्ष सुभाष (बापू)ओहोळ जिल्हा महासचिव प्रवीण (अण्णासाहेब) वाघमारे जिल्हा उपाध्यक्ष आनंद पोळ, जिल्हा उपाध्यक्ष निलेश लांडगे,जिल्हा संघटक वामन अडसूळ,जिल्हा सल्लागार पोपट लोंढे, तालुका उपाध्यक्ष अजय पवळ,करमाळा तालुकाध्यक्ष जनार्दन उबाळे, माढा तालुका महासचिव आकाश साळवे,तालुका उपाध्यक्ष संभाजी कांबळे,तालुका संघटक महावीर पोळ,करमाळा शहराध्यक्ष गणेश कांबळे, पत्रकार सागर लांडगे, कविटगावचे विद्यमान सरपंच शिवाजी सरडे माजी उपसरपंच भीमराव कांबळे,माजी उपसरपंच पोपट पांडव, यशवंत पांडव सहदेव माने,(महाराज) ,दत्तात्रय फुगे ,दादासाहेब पांडव , शाखाध्यक्ष विनोद शेख शाखा उपाध्यक्ष श्रीमंत कांबळे शाखा सचिव श्रीकृष्ण कांबळे शाखा सहसचिव रामा पांडव,सुदर्शन माने,

संघटक सुखदेव माने(महाराज) मा. सरपंच भगवान लोणकर, मा. उपसरपंच




भीमराव कांबळे मा. सरपंच पोपट पांडव, मा. उपसरपंच वसंत शिंदे ,दत्तात्रय फुगे, शाखा मार्गदर्शक दादासाहेब पांडव

शाखा सदस्यः- सतीश लोणकर यशवंत कांबळे ,साजन शेख, विशाल कांबळे ,उमेश पांडव, रज्जाक शेख, मुस्ताफ शेख ,दादा डुकळे ,शब्बीर शेख ,लखन पवार, बिबीशन कांबळे, लखन कांबळे, बाळू डुकळे ,बालाजी लोणकर, विपुल कांबळे ,अण्णासाहेब कांबळे, रामा भालेराव, सनी कांबळे, रितेश पांडव ,पृथ्वीराज पांडव, कृष्णा पांडव,विनोद भेंडे,नाना धेंडे,अक्षय धेंडे, धनंजय धेंडे,भैय्या धेंडे,कुणाल धेंडे, करण कांबळे ,पिंटू रोंगे अमोल अवघडे, पप्पू पोळ,नंदु पोळ,समाधान डफळ,यश पोळ, विवेक पोळ,मयूर कवितेत,साहिल पोळ,यश साळवे,सूरज साळवे,संतोष आडागळेतसेच असंख्य पदाधिकारी व ग्रामस्थ व पंचक्रोशीतील कार्यकर्ते हजारोंच्या संख्येने उपस्थित होते❉

# मोलमजुरी करून खाणारे ७२ वर्षांचे सातनदुधनीचे गणपती हणमंत कोळी यांनी दिली समाजासाठी स्वतःची जमीन दान

> माझे वडील आज ७२ वर्षांचे आहेत, समाजा साठी आपण ही काहीं तरी करावे म्हणून त्यांनी आमची स्वतःची जमीन जय दुर्गादेवीचे नावाने समाजासाठी दान दिली आहेत त्यांचे हे ऋण न फिटणारे असे आहे. आज देखील दुसऱ्याच्या शेतात राबत माझे वडील जमिन दान देऊन फार मोठे कर्तव्य पार पाडले आहेत.
>
> **देवेंद्र कोळी,संस्थापक अध्यक्ष जय दुर्गादेवी बहु.सामाजिक संस्था सातनदुधनी**

अक्कलकोट/महेश गायकवाडः अक्कलकोट तालुक्यातील सातनदुधनी येथील कोळी समाजातील अत्यंत गरीब कुटुंबातील व्यक्ती गणपती हणमंत कोळी यांनी गावचे आराध्य दैवत जयदुर्गादेवी कोळी समाजासाठी स्वतःची जमीन रितसर नावाने करून दान दिली आहेत. मालमत्ता क्रमांक १०३ मालमत्तेचे वर्णन पु.प २० उ.द१६ अशी त्याचा मालमत्ता क्रमांक आहे. त्यांनी अनेक वर्षापासून कोळी समाजासाठी सामाजिक सांस्कृतिक कामांमध्ये सहभागी होऊन आपला समाज मागे राहू नये म्हणून स्वतःची जागा कोळी समाजासाठी दिलेले आहेत. गणपती हणमंतु कोळी यांच्या या दात्रत्वाचे सर्वत्र कौतुक केले जात असुन अभिनंदन केले जात आहे. कोळी समाजाकडून ठिकठिकाणी त्यांचा सत्कार होत आहे. त्यांनी अनेक वर्षापासून कोळी समाजाच्या अडचणी पाहून स्वतःच्या मालकीची जागा त्यांनी समाजासाठी दान देऊन समाजाच्या



नावाने उतारा करून ही जागा माझी नाही समाजाची आहे अशी त्यांनी ग्वाही दिली, समाजाला त्यांनी पूर्णतः जागा अर्पण केले आहेत. यावेळी त्यांचें कोळी समाजाकडून अभिनंदन ही करण्यात आले, गणपती कोळी हे कोळी समाजातील अतिशय सर्वसामान्य व्यक्ती असून जय दुर्गादेवी सामजिक संस्थेचे अध्यक्ष देवेंद्र कोळी यांचे ते वडील आहेत. ते पुर्वी पासूनच सामाजिक कार्यात आवड असलेले व्यक्ती आहेत. वडिलांची समाजसेवा करण्याची आवड असल्यामुळे त्यांचा मुलगा देवेंद्र कोळी यांनीही वडिलांकडे मागणी केली की समाजासाठी आपण काहीतरी देणे आहोत त्यासाठी आपण समाजाला आपली थोडी जमीन दान देऊ. जमीन अर्पण करण्याचा निर्णय वडिलांशी चर्चा करून घेतल्यावर त्यांनी समाजासाठी ही जागा दिली आहेत. शुक्रवार दिनांक १ मार्च २४ रोजी समाजांला माझ्या जमिनीचा उतारा समाजाचे नावाने झाला आहे असे गणपती कोळी यांनी जाहिर केले. गणपती कोळी यांनी वयाच्या ७२ व्या वर्षी कोळी समाजासाठी आवड निर्माण करून कोळी समाजाला माझी एक आठवण असावी म्हणुन सत्तर वर्ष मूलमजुरी करून गरीबी मधुन संसार उभा करून समाजासाठी स्वतःची जागा दान दिले आहेत. आता सध्या देखील ते दुसऱ्याच्या शेतात मोलमजुरीचे काम करून आपल्या संसाराचे पोट भरून घेत आहेत अशा परिस्थितीत त्यांनी समाजासाठी जागा दिलेली आहे, ही फार मोठी आणि श्रीमंताच्या आणि धन दांडग्यांच्या डोळ्यात अंजन घालणारी घटना आहे.

# स्वेरीकडून येत्या ११ मार्च पासून ऑनलाईन सीईटी ‘क्रॅश कोर्स’चे आयोजन

## बारावी सायन्सचे विद्यार्थी करू शकतात एमएचटी-सीईटी ची ऑनलाईन तयारी

पंढरपूर/प्रतिनिधीः ‘स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर कडून येत्या सोमवार, दि.११ मार्च २०२४ पासून ते रविवार, दि. ३१ मार्च २०२४ पर्यंत ऑनलाईन सीईटी ‘क्रॅश कोर्स’चे आयोजन करण्यात आलेले असून यामध्ये अभियांत्रिकी प्रवेशाच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या फिजिक्स, केमिस्ट्री आणि मॅथ्स या तीन विषयांवर स्वेरीतील तज्ञ प्राध्यापक मार्गदर्शन करणार आहेत. हा ‘क्रॅश कोर्स’ मोफत असून यामध्ये बारावी सायन्सची परीक्षा दिलेले विद्यार्थी यामध्ये सहभागी होऊ शकतात.




तसेच या ‘क्रॅश कोर्स’ नंतर स्वेरी मध्ये ‘मॉक सीईटी’चे देखील आयोजन करण्यात आले आहे. तरी विद्यार्थ्यांनी या अनमोल संधीचा लाभ घ्यावा.’ असे आवाहन स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे यांनी केले आहे. शासनाच्या सी.ई.टी. सेलकडून बारावी सायन्सच्या विद्यार्थ्यांची सीईटी परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसार घेतली जाणार आहे. पीसीएम ग्रुपची सीईटी परीक्षा दि.२५ एप्रिल ते ३० एप्रिल २०२४ दरम्यान घेतली जाणार आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्रवेश घेण्यासाठी आवश्यक असलेल्या एमएचटी- सीईटी २०२४ या परीक्षेची तयारी कशी करावी? यासाठी अभ्यासक्रम कोणता? याचे स्वरूप असे सीईटी परीक्षेसंबंधी अनेक प्रश्न विद्यार्थ्यांना पडतात आणि हाच धागा पकडून स्वेरीने या मोफत ऑनलाईन ‘क्रॅश कोर्स’चे आयोजन केले आहे. विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी मानून त्यांच्या हिताच्या बाबी लक्षात घेवून आणि शैक्षणिक गरजांना अनुसरून ‘स्वेरी’ नेहमीच नवनवीन शैक्षणिक उपक्रम राबवत असते. त्याचाच एक भाग म्हणून ‘स्वेरी’ने बारावी सायन्सच्या विद्यार्थ्यांसाठी या ‘क्रॅश कोर्स’चे आयोजन केले आहे. ’विद्यार्थ्यांना या ऑनलाइन ‘क्रॅश कोर्स’च्या माध्यमातून ‘एमएचटी- सीईटी २०२४’ या परीक्षेच्या तयारीची व सरावाची संधी मिळणार आहे. तरी या सुविधेचा विद्यार्थ्यांनी अवश्य लाभ घ्यावा.’ असे आवाहन प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी केले आहे. ‘विद्यार्थ्यांनी ‘क्रॅश कोर्स’ साठी आपले नाव नोंदवण्यासाठी मोबाईल क्र. ९५९५९२११५४ व ९१६८६५५३६५ यावर संपर्क साधण्याचे आवाहन अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता प्रा. करण पाटील यांनी केले आहे.

# फटाक्यांच्या आतिषबाजीत व ढोल सनई ताष्यांच्या सवाई वाद्यात कोडीत येथे श्रींच्या लग्नाची वरात

पुरंदर : वीर येथे, रंगाची उधळण करीत रंगाची मारामारी झाल्यानंतर, एकादिशीला , वीर येथील मंदीराला प्रदक्षिणा घालून, कोडीतच्या पालखीचे वीर येथून सकाळी ६ वाजता पालखीने कोडीतकडे प्रस्थान करण्यात आले, यापूर्वी सकाळी श्रींच्या मुर्तींना अभिषेक घातल्यानंतर श्रींच्या मूर्तीला पुष्पहार अर्पण करण्यात आला, यादववाडी, पिलाण वाडी, पिंपळे, सुपे या ठिकाणी विश्रांती घेत सायंकाळी ४ - ०० वाजता,कोडीत येथे श्रीनाथांची पालखी नाथांचे भक्त तुळाजीबुवा मंदीरात विसावली , यापूर्वी बुधवार दि. ६ मार्चला सकाळी श्रींच्या मुर्तींना अभिषेक घालून, उत्सव मुर्तींना पुष्पहार घालण्यात आल्यानंतर मानापानांचा नारळ दिल्यानंतर वीर देवस्थानच्या आजी माजी पदाधिकारी यांच्या निरोपा नंतर लवाजम्यासह पालखीने कोडीतकडे प्रस्थान केले, तुळाजीबुवा मंदीरात देवाला नैवेद्य दिल्यानंतर आरती झाल्यानंतर गज गोपाळांचा कार्यक्रम झाल्यानंतर गावातील सर्व देवीदेवतांना मिरवणूकीने पुष्पहार अर्पण केल्यानंतर रात्री ९ - ०० वाजता ढोल ताशा सनई झांज या पारंपरिक वाद्यांच्या गजरात , फटाक्यांच्या आतिषबाजीत दिवट्यांच्या प्रकाशात गुलालाची उधळण करीत, व नातं साहेबांचे चांगभलं , सवाई सर्वांचे चांगभलचा गजर देत , श्रीनाथ म्हस्कोबा महाराज व माता जोगेश्र्वरी यांच्या लग्नाची शाहीवरातीची भव्य मिरवणूक काढण्यात आली, यावेळी मोठ्या संख्येने नाथांचे भावीभक्त मिरवणूकीत सहभागी झाले होते, गावांमध्ये रस्त्यांच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणात , विद्युत रोषणाई करण्यात आली होती, यावेळी गावातील सर्व मंदीरावर विद्युत रोषणाई केली होती, महिलांनी घराबाहेर समोर सडा व रांगोळी घातली होती, पालखीच्या पुढे मागे सालकरी ,डागकरी ,मानकरी , खांदेकरी काटकर पंचात्रे फुलावरे ढोले, अबदागिरी, काळुबाई मंडळ, भोसले कांबळे सोनवणे, जरांडे राजिवडे, जाधव तळेकर, खैरे आदी भावीभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते, पालखी पारावर आल्यानंतर काळभैरवनाथ मंदीराला प्रदक्षिणा घातल्या नंतर छबिण्याचा कार्यक्रम झाला नंतर श्रीनांथाच्या भाकणूकीचा कार्यक्रम होऊन, वरातीचा कार्यक्रमाची सांगता करण्यात आली,

